# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **17/07/2022**

**Brief of the work done :-**

ATM मधील इन्व्हर्टरच्या 02 बॅटऱ्या चोरट्यास अटक.

## एटीएममधून इन्व्हर्टरची बॅटरी चोरणारा अटकेत

**मालेगाव, ता. १७ :** स्थानिक देशपांडे प्लॉटमध्ये असलेल्या हिताची कंपनीच्या एटीएममधून सुमारे २४ हजार २१६ रुपये किमतीच्या एक्साइड कंपनीच्या २ बॅटऱ्या चोरीला गेल्याची घटना २२ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली होती.

या प्रकरणात भादवी कलम ३८०, ३४ अन्वये मालेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६९/२०२२ नोंदवून गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास ठाणेदार किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल कैलास कोकाटे करीत होते. एटीएममध्ये लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजनुसार १८ फेब्रुवारी रोजी सुमारास पांढऱ्या रंगाच्या सँट्रो कारने चोरी केल्याची बाब उघड झाली होती.

मालेगाव सारखीच हिताचीच्या एटीएममधून बॅटरी चोरीला गेल्याची घटना २३ जून रोजी वाशीममध्ये घडली होती. तेथे सीसीटीव्ही फुटेजमध्ये मालेगांव येथील चोरीत वापरण्यात आलेली पांढऱ्या रंगाची सँट्रो कार दिसून आल्याने त्या आधारे वाशीम पोलिसांनी महादेव विश्वनाथ सदार वय ३६, मूळचा राहणारा चातारी तालुका पातूर जिल्हा अकोला, जो सध्या ओंकार कॉलनी, पिंपळेगुरव पुणे येथे राहत होता, यास १२ जुलै रोजी पुणे येथून अटक करून वाशीम येथे आणले. न्यायालयाने आरोपीला तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिल्यानंतर मालेगावचे ठाणेदार किरण वानखेडे व तपास अधिकारी कैलास कोकाटे यांनी वाशीम येथे जाऊन आरोपींची चौकशी केली असता आरोपीने मालेगाव येथील हिताची एटीएममधून बॅटरी चोरल्याची कबुली दिली. त्या आधारे मालेगाव पोलिसांनी या आरोपीला १६ जुलै रोजी वाशीम कारागृहातून ट्रान्सफर वॉरंटवर ताब्यात घेतले व मालेगाव न्यायालयात हजर केले. न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. चोरीच्या बॅटऱ्या जप्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक बच्चनसिंह अप्पर पोलिस अधीक्षक गोरख भामरे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील कुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार किरण वानखेडे, सहायक पोलिस निरीक्षक प्रदीपकुमार राठोड, पोलिस हेड कॉन्स्टेबल कैलास कोकाटे, नायब पोलिस कॉन्स्टेबल माणिक खडसे, गजानन शिंदे, विजय डोईफोडे यांनी केली आहे.